दैनिक
# श्रमिक लोकराज्य
नांदेड,परभणी,लातूर,हिंगोली येथे वितरीत होणारे वृतपत्र

संपादक
ज्ञानेश्वर बालाजीराव डोईजड
मो.7875782377

कार्यकारी संपादक
वैजनाथ द.स्वामी
मो.8329736330

उपसंपादक
दत्ता पा.माळेगावे गोजेगावकर
मो.9766761475

नांदेड । दैनिक । वर्ष ५ । अंक १०३ । मंगळवार, दि.०९ डिसेंबर २०२५ । RNI MAHMAR/2021/85782 । पाने ०४ । किंमत २ रुपये । ई–पेपर : www.shramiklokrajya.in

## कोम्बींग ऑपरेशनमध्ये तीन आरोपी जेरबंद – अग्नीशस्त्र, जिवंत काडतूस आणि खंजीर जप्त

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**नांदेड :** नांदेड जिल्ह्यात रेकॉर्डवरील गुन्हेगार, पाहिजे फरारी आरोपी तसेच अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधात सुरू असलेल्या कोम्बींग ऑपरेशनदरम्यान स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे. तीन आरोपींना अटक करून त्यांच्या कब्जातून एक अग्नीशस्त्र, दोन जिवंत काडतूस आणि दोन खंजीर जप्त करण्यात आले आहेत.



ही कारवाई पोलीस अधीक्षक मा. श्री. अविनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली, अपर पोलीस अधीक्षक मा. श्रीमती अर्चना पाटील (भोकर) व मा. श्री. सुरज गुरव (नांदेड) यांच्या देखरेखीखाली करण्यात आली.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री उदय खंडेराय यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री मिलींद सोनकांबळे व रविशंकर बामणे अनिल बिरादार अझरोद्दीन शेख
चंद्रकांत स्वामी व पथक हे शिवाजीनगर परिसरात कोम्बींग ऑपरेशनदरम्यान गुप्त माहितीच्या आधारे कारवाईसाठी पोहोचले.
आंबेडकर नगर येथून अनिल उर्फ भुऱ्या सुधाकर गच्चे (वय 23) याला ताब्यात घेऊन त्याच्याकडून एक अग्नीशस्त्र व दोन जिवंत काडतूस जप्त केले.
तसेच तेहरा नगरमधून शुभम उर्फ शिवा जालिंदर दवणे (वय 24) आणि शुभम पंढरी गायकवाड (वय 23) या दोघांकडून दोन खंजीर पंचां समक्ष जप्त करण्यात आले.
या प्रकरणी पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे
गुरन 439/2025 कलम 3/25 शस्त्रकायदा
आणि
गुरन 440/2025 कलम 4/25 शस्त्रकायदा
अंतर्गत दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील तपास शिवाजीनगर पोलीस करीत आहेत.
सदर यशस्वी कामगिरीबद्दल पोलीस अधीक्षक मा. श्री. अविनाश कुमार यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाचे अभिनंदन केले आहे.

# शाळांमध्ये होणार शुकशुकाट!

## ५० हजार शिक्षक १० डिसेंबरला नागपूरला अधिवेशनात देणार धडक

**मुंबई/प्रतिनिधी -** राज्यातील तब्बल 50 हजार शिक्षक 10 डिसेंबरला नागपूर अधिवेशनात धडक देणार आहेत.
ठाण्यासह राज्यातील शिक्षकांचा यामध्ये समावेश आहे. विद्याथ्यर्थ्यांच्या पटसंख्येनुसार लावण्यात आलेल्या शिक्षकांच्या संचमान्यता निकषांवर राज्यातील असंख्य शाळा बंद होऊन शिक्षक सरप्लस होणार आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील विविध शिक्षक संघटना एकवटल्या असून त्यांनी 5 डिसेंबरला पुकारलेल्या एक दिवसीय शाळा बंद आंदोलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्यानंतर राज्यभरातील किमान 50,000 हून अधिक शिक्षक विविध मागण्यांसाठी नागपूरच्या अधिवेशनात १० डिसेंबरला धडक देणार आहेत.
आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी नागपुरात ठिय्या मांडून शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधणार आहेत.
१५ मार्च २०२४ च्या संचमान्यतेच्या जीआरमुळे आदिवासी क्षेत्रातील विद्यार्थ्यांची पटसंख्या २० पेक्षा कमी असलेल्या शाळा बंद होणार असून असंख्य विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार आहेत.



शासनाच्या या धोरणामुळे आदिवासी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गदा आणणारा १५ मार्च २०२४ चा शासकीय जीआर रद्द करून जुनी संच मान्यता धोरण राबवण्याची जोरदार मागणी करण्यात आली आहे.
कमी पटसंख्येच्या शाळांसाठी आंदोलन
२०१३ व्या शासन निर्णयापासून शिक्षक भरतीसाठी टीईटी धोरण लागू असतांना २०१३ पूर्वीपासून सेवेत असलेल्या शिक्षकांना टीईटी परीक्षेची सक्ती अन्यायकारक असल्याने ती सक्ती रद्द करावी. यांसह एक नोव्हेंबर २००५ पूर्वी लागलेल्या व त्यानंतर सेवेत रुजू झालेल्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, ठाणे जिल्ह्यात आदिवासी क्षेत्र व पेसा क्षेत्रात काम करीत असलेल्या शिक्षकांना कोर्टाच्या आदेशानुसार एकस्तर वेतन श्रेणी विनाअट त्वरित लागू करणे, वस्तीशाळा शिक्षकांची जुनी सेवा ग्राह्य धरून त्यांना सेवेचे सर्व लाभ देणे, अशा अनेक मागण्यासाठी राज्यातील शिक्षक
नागपूर अधिवेशनात
धडक देणार असल्याचे शिक्षक भारती संघटनेचे अध्यक्ष एकनाथ तारमळे, सुरेश विशे यांनी सांगितले आहे.
नाशिक येशील कुंभमेळ्यासाठी गांजा फुकणाऱ्या साधुसंतांसाठी चौदा हजार कोटी रुपये खर्च करायला तयार असणारे राज्य सरकार मराठी माध्यमाच्या शाळा वाचविण्यासाठी व आदिवासी, गोरगरीब, शोषित, वंचित विद्याथ्यांचे शिक्षण वाचविण्यासाठी दोन हजार कोटी रुपये खर्च करू शकत नाही, हे चित्र महाराष्ट्रासाठी अशोभनीय आहे, असं मत भारती ठाणे जिल्ह्यातील शिक्षक, अध्यक्ष एकनाथ तारमळे यांनी व्यक्त केलं.

## ८वा वेतन आयोग कधी लागू होणार? सरकारने लोकसभेत दिली 'डेटलाइन'

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था -** देशातील लाखो सरकारी कर्मचारी आणि निवृत्ती वेतनधारक ८व्या केंद्रीय वेतन आयोगाच्या अंमलबजावणीची आतुरतेने वाट पाहत आहेत. आता केंद्र सरकारने याबद्दल एक महत्त्वाचे अपडेट दिले आहे.
अर्थ मंत्रालयाने लोकसभेत स्पष्ट केले आहे की, ८ वा वेतन आयोग नेमका कधी लागू केला जाईल, याबद्दलचा निर्णय सरकार नंतर घेईल. याशिवाय, आयोगाच्या ज्या शिफारसींना सरकार मान्यता देईल, त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी आगामी अर्थसंकल्पात पुरेसा निधी उपलब्ध करून दिला जाईल, असेही मंत्रालयाने सांगितले. यापूर्वी ८ वा वेतन आयोग १ जानेवारी २०२६ पासून लागू होऊ शकतो, असे संकेत मिळत होते. मात्र, मंत्रालयाच्या ताज्या स्पष्टीकरणामुळे निश्चित तारीख पुढे ढकलली गेली आहे. धोरण स्तरावर इतर टाइमलाइनवरही चर्चा झाली आहे. यात आर्थिक वर्ष २०२८ पासून अंमलबजावणी करणे आणि १ जानेवारी २०२६ पासून सुरू होणाऱ्या पाच तिमाहीसाठी थकबाकी देण्याचा पर्याय देखील समाविष्ट आहे. मंत्रालयाने आपल्या नवीन निवेदनात कोणत्याही विशिष्ट तारखेची पुष्टी केलेली नाही. मंत्रालयाच्या माहितीनुसार, ८ वा वेतन आयोग त्याची स्थापना तारीख म्हणजेच ३ नोव्हेंबर २०२५ पासून १८ महिन्यांच्या आत आपला अहवाल सरकारला सादर करेल. सरकारने यापूर्वीच हा आयोग अधिकृतपणे अधिसूचित केला असल्याचे स्पष्ट केले आहे. कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्याचे किंवा निवृत्ती वेतनधारकांच्या महागाई निवारण भत्त्याचे त्यांच्या मूळ वेतनात विलीनीकरण करण्याचा कोणताही प्रस्ताव सध्या विचाराधीन नाही, हे सरकारने स्पष्ट केले आहे. नवीन वेतन आयोग लागू झाल्यानंतर सरकारी तिजोरीवर पडणाऱ्या आर्थिक भाराबद्दल चिंता वाढत आहे. पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेचे सदस्य नीलकंठ मिश्रा यांनी सांगितले की, जर ८ वा वेतन आयोग आर्थिक वर्ष २०२८ मध्ये लागू झाला, तर याचा सरकारी वित्तावर मोठा दबाव पडेल. त्यांचा अंदाज आहे की, केंद्र आणि राज्यांवर एकूण ४ लाख कोटींहून अधिकचा बोजा पडेल. जर पाच तिमाहीची थकबाकी जोडली गेली, तर ही रक्कम सुमारे ९ लाख कोटींपर्यंत पोहोचू शकते.

## गुरूवारी लोणी खुर्द येथे महाप्रसादाचे आयोजन






**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**नांदेड दि. 8 -** मौजे लोणी खुर्द ता. अर्धापूर येथील गट नं. 204, अशोक गो. देशमुख, सौ. वैजयंती अशोक देशमुख व रविंद्र गो. देशमुख यांच्या शेत जमिनीतील स्थित जागेमध्ये असलेल्या मंदिराची पुनर्बांधणी झाली असून येथे दि. 5 डिसेंबरपासून हरिनाम सप्ताह चालू आहे. सप्ताहाची सांगता व कामाई देवीच्या मूर्तीची पुनर्स्थापना दि. 11 डिसेंबर 2025 गुरूवारी होत असून या निमित्ताने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.
तरी सर्व गावकऱ्यांनी या महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अशोक गो. देशमुख, सौ. वैजयंती अशोक देशमुख व रविंद्र गो. देशमुख यांनी केले आहे.

## बुधवारी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलन शुभारंभ

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**नांदेड दि. 8 डिसेंबर :-** सशस्त्र सेना ध्वजदिन निधी 2025-26 संकलन शुभारंभ कार्यक्रम बुधवार 10 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 11.15 वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड




येथे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या कार्यक्रमास पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे आणि इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.
या कार्यक्रमामध्ये सशस्त्र सेना ध्वजदिन निधी 2024-25 मध्ये उत्कृष्ट संकलन करणाऱ्या कार्यालय प्रमुख, कर्मचारी, सहसंस्था यांना प्रशस्तीपत्रके देऊन सत्कार करण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्यातील वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता विशेष गौरव पुरस्कार प्राप्त पाल्यांचा सत्कार व माजी सैनिकांच्या पाल्यांना विशेष गौरव पुरस्कार वाटप करण्यात येणार आहे. तरी जिल्ह्यातील सर्व वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता, माजी सैनिक, विधवा पत्नी व त्यांचे अवलंबितांनी कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, नांदेड यांनी केले आहे.

## लोकशाही प्रक्रीयेत सहभागासाठी जास्तीत जास्त पदवीधर मतदारांनी नाव नोंदणी करावी - विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर

**छत्रपती संभाजीनगर, -** भारत निवडणूक आयोगाने घोषीत केलेल्या कार्यक्रमानुसार ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघाची प्रारुप मतदार यादी दिनांक ०३.१२.२०२५ रोजी प्रसिध्दी झालेली आहे. सदर यादीवर दिनांक ०३.१२.२०२५ ते १८.१२.२०२५ या कालावधीत दावे व हरकती स्विकारण्यात येणार आहेत व त्यासाठी मतदान केंद्रनिहाय पदनिर्देशीत अधिकारी नियुक्त करण्यात आलेले आहेत. नियुक्त अधिकारी यांना दावे व हरकती स्वीकारण्याच्या कालावधीत कार्यालयीन वेळेत सदर मतदान केंद्राच्या ठिकाणी उपस्थित राहून अर्ज स्विकारण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. दिनांक ०६.११.२०२५ ते ०२.१२.२०२५ या कालावधीत ऑनलाईन व ऑफलाईन जे अर्ज प्राप्त झालेले आहेत ते सर्व अर्ज आता दावे व हरकती स्विकारण्याच्या कालावधीत डाटाएन्ट्री करुन निकाली काढण्यात येणार आहेत. महिला मतदारांकडे नावातील बदलाच्या संदर्भात आवश्यक कागदपत्रांची पडताळणी व आवश्यकतेनुसार गृहचौकशी करुन नियमानुसार कार्यवाही करण्यात येणार




आहे. प्रारुप मतदार यादीच्या तपासणी मध्ये आढळून आलेल्या त्रुटी तपासून या त्रुटींची नियमानुसार तात्काळ दुरुस्ती करण्याच्या सूचना सर्व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांना देण्यात आलेल्या आहेत.
मतदार नोंदणी ही निरंतर चालणारी प्रक्रिया असल्याने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत सुरु असते. अर्ज दाखल करण्याकरीता ऑनलाईन व ऑफलाईन या दोन्ही पध्दती चालु रहाणार असून मतदार नोंदणीचा ऑफलाईन अर्ज स्वीकारण्यास कोणीही नकार देवू नये, असे निर्देश क्षेत्रीय स्तरावरील सर्व सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांना देण्यात आलेले आहेत.
लोकशाही प्रक्रीयेत सहभाग नोंदवून जास्तीत जास्त नाव नोंदणी करावी, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केले आहे.

## श्री खंडोबा माळेगाव यात्रेनिमित्त पोलीस अंमलदारांना अधिकार प्रदान

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**नांदेड दि. 8 डिसेंबर :-** माळेगाव येथील खंडोबा यात्रेतील पालखी मिरवणूक व इतर कार्यक्रम शांततेत पार पडावे. त्यात कसल्याही प्रकारची बाधा येऊ नये व शांतता रहावी म्हणून पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी मुंबई पोलीस कायदा 1951 कलम 36 अन्वये प्राप्त अधिकारान्वये 18 डिसेंबर 2025 च्या मध्यरात्रीपासून ते 23 डिसेंबर 2025 च्या मध्यरात्रीपर्यंत कंधारचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती अश्विनी जगताप व माळाकोळीचे सहा. पोलीस निरीक्षक महेश मुळीक यांना महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 कलम 36 मधील पोट कलम अ ते फ प्रमाणे पुढील अधिकार प्रदान केले आहेत.
श्री खंडोबा यात्रेत महाराष्ट्र, तेलंगणा, आंध्रप्रदेश, कर्नाटक, इतर राज्यातून भाविकांची दर्शनासाठी व यात्रेसाठी मोठ्या प्रमाणात गर्दी होते. त्याअनुषंगाने रस्त्यावरील व रस्त्याने जाणाऱ्या मिरवणुकीतील किंवा जमावातील लोकांनी कशा रितीने चालावे व कोणत्या रितीने वागावे हे फर्मविण्यासाठी. अशा कोणत्याही मिरवणुका कोणत्या मार्गाने आणि कोणत्या वेळात काढाव्यात किंवा काढू नयेत असे मार्ग







व अशा वेळा विहित करण्याबद्दल. सर्व मिरवणुकीच्या व जमावाच्या प्रसंगी व पुजा-अर्चेच्या प्रार्थना स्थळाच्या सर्व जागेच्या आसपास पुजा-अर्चेच्या वेळी कोणताही रस्ता किंवा सार्वजनिक जागा येथे गर्दी होणार असेल किंवा अडथळे होण्याचा संभव असेल अशा सर्व बाबतीत अडथळा होऊ न देण्याबद्दल. सर्व रस्त्यावर किंवा रस्त्यांमध्ये, घाटांत किंवा घाटांवर, सर्व धक्क्यांवर व धक्क्यांमध्ये आणि सार्वजनिक स्नानाच्या, कपडे धुण्याच्या व उतरण्याच्या जागांच्या ठिकाणी व जागांमध्ये, जत्रा, देवालये आणि सार्वजनिक स्थळी किंवा लोकांच्या जाण्या-येण्याच्या जागेमध्ये सुव्यवस्था राखण्याबद्दल. तसेच सार्वजनिक ठिकाणी अथवा सार्वजनिक करमणुकीच्या ठिकाणी ध्वनीक्षेपकांच्या आवाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी व सूचना देण्यासंबंधी. महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 33, 35 ते 40, 42, 43, 45 या अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशास अधीन असलेले व त्यास पुष्टी देणारे सुव्यवस्था राखणे कामी योग्य आदेश देण्याबाबत.
कोणीही इसमांनी हा आदेश लागू असे पर्यंत नांदेड जिल्ह्यातील कंधार येथील उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती अश्विनी जगताप व माळाकोळीचे सहा. पोलीस निरीक्षक महेश मुळीक यांचेकडून रहदारीचे नियम व मार्गाबाबत सुचना कार्यक्रमाची तारीख, वेळ, जाहीर सभा, मोर्चे, मिरवणूक, निदर्शने, पदयात्रा इत्यादी कार्यक्रम संबंधीत पोलीस फौजदार किंवा वरिष्ठ अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाचे पालन करावे.
परवानगी दिलेल्या जाहिर सभा/मिरवणूका/पदयात्रा यात समयोजित घोषणा सोडून किंवा ज्या घोषणांनी शांतता व सुव्यवस्थेला बाधा होऊ शकते अशा घोषणा देऊ नये. हा आदेश लग्नाच्या ठिकाणी, प्रेत यात्रेस लागू नाही. या आदेशाचे उल्लंघन केल्यास मुंबई कायदा कलम 134 प्रमाणे अपराधास पात्र ठरेल, असे आदेशही पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी जारी केले आहेत.

## संपादकीय

### युरोपची शांतताविरोधी लुडबूड...

रशिया आणि युक्रेनमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मांडलेली २८ कलमी शांतता योजना ही एक स्वागतार्ह पाऊल आहे. रशियासोबतचे युद्ध संपवण्यासाठी त्यांनी अद्ययावत आणि परिष्कृत शांतता चौकट तयार केल्याचे अमेरिका आणि युक्रेनने म्हटले असले तरी, युरोपीय देशांनी त्यांचा स्वतःचा मूलगामी पर्याय प्रस्तावित केल्यानंतर काही तासांतच, मूळ यूएस-समर्थित दस्तऐवजात मांडलेले काही रशिया समर्थक मुद्दे वगळण्यात आले. गेल्या आठवड्यात लीक झालेल्या मूळ २८ कलमी अमेरिकेच्या दस्तऐवजात युक्रेनने रशियाला भूभाग सोपवण्याची, त्याच्या सैन्याच्या आकारावर मर्यादा घालण्याची आणि कथित युद्ध गुन्ह्यांसाठी क्रेमलिनचा पाठलाग न करण्याची मागणी करण्यात आली आहे.


जिनेव्हा येथे चर्चा सुरू होताच, डोनाल्ड ट्रम्प म्हणाले की युक्रेनने संघर्ष संपवण्याच्या अमेरिकेच्या प्रयत्नांबद्दल 'शून्य कृतज्ञता' दाखवली आहे. सलोख्याच्या प्रतिसादात झेलेन्स्की म्हणाले की वॉशिंग्टनने दिलेल्या लष्करी मदतीबद्दल ते वैयक्तिकरित्या अमेरिकन अध्यक्षांचे आभारी आहेत, ज्याची सुरुवात जेव्हलिन क्षेपणास्त्रांपासून झाली, ज्यामुळे युक्रेनियन लोकांचे जीव वाचले. युक्रेनच्या युरोपीय मित्र राष्ट्रांनी त्यांची कीव-अनुकूल योजना प्रकाशित केली. त्यामध्ये म्हटले आहे की, युद्धबंदी झाल्यानंतर भूभागावरील वाटाघाटी व्हाव्यात आणि संपर्क रेषेपासून सुरुवात करावी. रशियाविरुद्धच्या युद्धात युक्रेनचा पराभव झाल्यानंतर युरोपची भूमिका अवज्ञा करणारी वाटते. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांना जो प्रस्ताव मान्य होणार नाही, तो युरोपने मांडणे हास्यास्पद आहे. रशियाने युद्ध जिंकले आहे. पराभूत झालेले लोक अटी घालू शकत नाहीत, हे वास्तव आहे.

मनोरंजक गोष्ट म्हणजे, युक्रेन हा युरोपमधील सर्वात भ्रष्ट देश आहे हे लपलेले नाही. झेलेन्स्की आणि त्यांची टोळी युद्धातून अब्जावधी डॉलर्स कमवत असताना त्यांनी सफाईदारपणे युक्रेनच्या जनतेचा वापर करून घेतला. अधिकारी नागरिक मुलांसह शाळेत जात असताना किंवा कुटुंबांसह किराणा दुकानात जात असताना अगदी घरातून, रस्त्यावरून त्यांचे अपहरण केले जात आहे. त्यांना सैन्यात भरती करत आहेत आणि फक्त एक महिन्याच्या प्रशिक्षणानंतर त्यांना आघाडीवर पाठवत आहेत. सुरुवातीला आपल्या मातृभूमीसाठी युद्धभूमीवर लढणाऱ्या शूर आणि देशभक्त युक्रेनियन लोकांना आता हे समजले आहे की नाटोच्या पाठिंब्याने भ्रष्ट राजवट केवळ त्यांचे हित साधत आहे आणि त्यांना युद्धभूमीवर मृत्यूकडे पाठवत आहे. अनेक युक्रेनियन लोक प्रतिकार न करता रशियाच्या बलाढ्य सैन्यासमोर शरण जात आहेत आणि कीवमध्ये बसलेल्या त्यांच्या मालकांच्या गुन्ह्याची कबुली देत आहेत. २०२१ मध्ये रशियाने युद्ध पुकारण्यामागील मुख्य कारणांपैकी एक म्हणजे युक्रेनला अण्वस्त्रधारी राष्ट्र बनवण्याचा आणि नाटोचा सदस्य होण्याचा युरोपीय देशांचा प्रस्ताव. येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की १९६२ मध्ये क्यूबन क्षेपणास्त्र संकटादरम्यान अमेरिकेने क्यूबाला सोव्हिएत अण्वस्त्रे घेण्यापासून रोखले होते . हे संकट १३ दिवसांच्या संघर्षामुळे जगाला दोन महासत्तांमधील अण्वस्त्र संघर्षाच्या उंबरठ्यावर आणले. अमेरिकेने क्युबाच्या अणू महत्त्वाकांक्षेला अडथळा आणण्याचे कारण असे दिले की त्यांना त्यांच्या अंगणात अणूयुद्धाचा धोका नको होता. या तर्कानुसार, रशिया युरोपियन देशांच्या प्रॉक्सी असलेल्या युक्रेनला त्यांच्या अंगणात अण्वस्त्रे मिळविण्याची परवानगी का देईल? युरोपच्या प्रस्तावामुळे शांतता प्रस्तावाला विरोध असल्याचे संकेत मिळत आहेत. रशिया-युक्रेन युद्धामुळे तिसरे महायुद्ध भडकू शकते, अशी तज्ज्ञांना भीती आहे. मानवतेला वाचवण्याच्या हितासाठी सर्व पक्ष एकत्र येऊन चागला प्रस्ताव मान्य करतील, अशी आशा करू या.

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त ठिकठिकाणी अभिवादन

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**हदगाव -** डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सहा डिसेंबर रोजी हदगाव तालुक्यात त्यांना ठीक ठिकाणी अभिवादन करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यामध्ये तालुक्यातील हरडफ येथे ग्रामसेवक एस के जिदेवार यांनी महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला हार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी गावचे सरपंच वंदना वाठोरे. उपासक गणपत वाठोरे. सुमनबाई वायवळ. चतुराबाई कवडे.मंगलबाई वाठोरे. अंजेना रगडे. रमाबाई कांबळे. धुरपताबाई थोरात. सुनिता वाठोरे. धुरपताबाई थोरात. जिजाबाई वाठोरे.शांताबाई वाठोरे. धम्मपाल वाठोरे. कुणाल मुनेश्वर. उत्तम नरवाडे. सुभाष वाठोरे. ज्ञानेश्वर थोरात. इत्यादी उपस्थित होते. त्यानंतर शहरातील तामसा रोडवर असलेल्या श्री. साईबाबा निवासी दिव्यांग विद्यालय मध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी पत्रकार यादव सुकापुरे. राहुल बहादुरे. शेख जुनेद. राजेश राऊत. शाळेचे



मुख्याध्यापक एस. बी. पाळेकर,मोरे खाकरे डी. एम. डाके, बी.एस. वाघमारे, आर. एम. वाट्टमवार,एस. आर. तावडे जि. डी.धडेवार,भूषण नरवाडे, सिद्धार्थ वनंजे. पी. व्ही. मुधोळ, वाघमारे मॅडम,घाटे मॅडम राठोड सर, रामलू सर चंद्रकांत गुंडेवाड, येरेवाड मॅडम. गोवंदे मॅडम व सर्व विद्यार्थी उपस्तित होते. पंचशील माध्यमिक विद्यालय येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन चरित्रावर शिक्षक अशोक वाढवे यांनी प्रकाश टाकला तर शिक्षक राहुल वाठोरे यांनी भिमराया घे तुझ्या या लेकराची वंदना हे गीत गाऊन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले तर शाळेचे सचिव सुनीलभाऊ सोनुले यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना हर अर्पण करून अभिवादन केले यावेळी

संचालक जगदीश कदम वसतिगृह व्यवस्थापक राजेश तुपकरी मुख्याध्यापक गोपाल बड्रेवार,पर्यवेक्षक अनिल दस्तूरकर,संदीप ढोले,परीक्षा प्रमुख जाधव सह सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. त्याचबरोबर पंचशील बुद्धविहार या ठिकाणी सामुदायिक वंदना घेऊन व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी सखोल असे मार्गदर्शन करून त्यांना अभिवादन करण्यात आले नागसेन नगर येथे मूलगंध कुटी बुद्ध विहारात सामुदायिक वंदना घेऊन अभिवादन करण्यात आले

# चिकाळा येथील शेतकऱ्यांनी वांगे टमाट्यावर कमावले लाखो रुपयांचे उत्पन्न

## पारंपारिक पिकाला बगल देऊन केली भाजीपाल्याची लागवड

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**हदगाव -** तालुक्यातील चिकाळा येथील शेतकरी यादव मनकापूर या शेतकऱ्यांनी माळरानाच्या जमिनीमध्ये अवघ्या वीस गुंठे टमाट्याच्या लागवडीवर व दहा गुंठे वांग्याच्या लागवडीवर चार लाख रुपयांचे उत्पन्न केले असून त्याच वेळी त्यांना खर्च ४० हजार रुपये आला असल्यामुळे शेतकरी हा व्यवसाय परवडणारा असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले आहे. हदगाव तालुक्यातील शेतकरी हे प्रामुख्याने पारंपारिक पीक जास्त प्रमाणात घेतात परंतु सध्या तरी तालुक्यामध्ये पारंपारिक पिकाशिवाय हळूहळू भाजीपाला लागवडीकडे शेतकरी वळत असल्याचे दिसून येत आहे. तालुक्यातील चिकाळा येथील शेतकरी यादव मनकापूरे यांच्याकडे चार एकर शेती असून या अगोदर ते पारंपारिक पीक घेत होते. यातून त्यांना फारसे उत्पन्न मिळत नव्हते परंतु ज्या दिवसापासून ते भाजीपाला लागवडीकडे वळाले त्या दिवसापासून त्यांना उत्पन्न भरघोस होऊ लागले होते आता त्यांच्याकडे हळद. कापूस व फक्त तीस ते चाळीस




गुंठ्यामध्ये ते भाजीपाल्याची लागवड करत असतात सिंचनासाठी विहीर पाईप ठिबकचा वापर केल्यामुळे वेळेची बचत झाली आहे. अवघ्या दोन महिन्यातच वांग्याची काढणी होत असते सध्या बाजारामध्ये टोमॅटो ची मागणी वाढली असून बाजार भाव सुद्धा ६० ते ८० रुपये किलो

**शेतात काय पिकतं यापेक्षा बाजारात काय विकत याकडे शेतकऱ्यांनी लक्ष देऊन योग्य वेळी लागवड करून संधीचे सोने केले तर शेती व्यवसाय हा परवडणारा व्यवसाय आहे जिद्द मेहनत चिकाटी यांची सांगड घालून स्वतः शेतकऱ्यांनी शेती केली तर शेती भरघोस उत्पन्न देऊ शकते**
**शेतकरी यादव मनकापुर चिकाळा ता. हदगांव जी. नांदेड**

असल्याने २० किलोचे कॅरेट दीड हजार रुपये पर्यंत विक्री होत असल्याने सतत एक महिन्यापासून माल निघत आहे. चिकाळा गावांना भोकर मार्केट व तामसा मार्केट जवळ असल्याने शेतकरी हे भोकर बाजारामध्ये माल घेऊन जातात शेतकरी यादव मनकापुर हे भाजीपाला लागवड करत असल्याने त्यांना भरघोस उत्पन्न मिळाले असल्याचे पाहून इतर शेतकरी सुद्धा भाजीपाल्याची लागवड करू लागले

# पाकिस्तानचा नवा हुकूमशहा? 27 वी दुरुस्ती आणि मुनीरची अखंड सत्ता




पाकिस्तानात अलीकडेच मंजूर झालेला 27वी घटनादुरुस्ती विधेयक हा देशातील कमकुवत लोकशाहीवरील लष्कराचे वर्चस्व आणखी मजबूत करण्याकडे टाकलेले पाऊल मानला जातो. या दुरुस्तीमुळे फील्ड मार्शल आणि लष्करप्रमुख सैयद असीम मुनीर यांना पूर्वी कधीही न दिलेले अधिकार आणि कायदेशीर संरक्षण मिळाले आहे. प्रत्यक्ष पाहता, या दुरुस्तीमुळे लष्कराने पुन्हा एकदा राष्ट्र, नागरी नेतृत्व आणि न्यायालयांसारख्या प्रमुख लोकशाही संस्थांना मागे टाकले आहे, हे स्पष्टपणे दिसून येते. हे 1973 च्या संविधानाची ताकद कमी करून सत्ता लष्कराच्या हातात अधिक एकवटण्याचा आणखी एक प्रयत्न असून, नागरी नेतृत्वाला दुय्यम स्थानावर ढकलले जात आहे. या दुरुस्तीमुळे मुनीर यांना कायद्याच्या कक्षेबाहेर ठेवत त्यांना इतर सर्व लष्करी दलांपेक्षा अधिक अधिकार प्राप्त होतात, आणि हीच बदललेल्या सत्तासंतुलनाची ठोस निशाणी आहे. नव्या दुरुस्तीनुसार फील्ड मार्शल आणि लष्करप्रमुख सैयद असीम मुनीर यांना पूर्वी कधीही न मिळालेले अधिकार आणि कायदेशीर संरक्षण दिले जाते.

पाकिस्तानच्या संविधानातील कलम 243 मध्ये बदल करून चीफ ऑफ डिफेन्स फोर्सेस (CDF) हे एक नवीन सर्वोच्च लष्करी पद निर्माण करण्यात आले आहे, आणि हे पद स्वयंचलितपणे विद्यमान लष्करप्रमुखांकडेच राहील. या दुरुस्तीनुसार, तिन्ही सैन्यदलांमध्ये समन्वय साधण्याची जबाबदारी असलेले चेअरमन जॉइंट चीफ्स ऑफ स्टाफ कमिटी (CJCSC) हे पद रद्द केले जाणार आहे. 27 नोव्हेंबर 2025 रोजी विद्यमान CJCSC निवृत्त झाल्यावर, फील्ड मार्शल मुनीर लष्करप्रमुख म्हणून CDF पदही स्विकारतील आणि त्यामुळे सर्व लष्करी दल त्यांच्या थेट अधीन येतील. याचा अर्थ पाकिस्तानच्या इतिहासात प्रथमच लष्कर संपूर्ण सैन्य संरचनेवर इतक्या व्यापक स्तरावर नियंत्रण मिळवेल. या बदलामुळे वायुदल आणि नौदल हे लष्कराच्या अधिपत्याखाली दुय्यम ठरू शकतात, ज्यामुळे तिन्ही दलांमध्ये असंतोष आणि स्पर्धा वाढण्याची शक्यता आहे.

या दुरुस्तीचे परिणाम केवळ लष्करी साखळीपुरते मर्यादित राहत नाहीत. ती पाकिस्तानच्या आण्विक शस्त्रांवरील नागरी नियंत्रणालाही कमकुवत करते. देशाच्या आण्विक दलांच्या नियंत्रणासाठी कमांडर ऑफ द नॅशनल स्ट्रॅटेजिक कमांड (CNSC) हे नवे पद निर्माण केले जाणार आहे. पंतप्रधान, CDF/लष्करप्रमुख यांच्या सल्ल्यानुसार, लष्करातील जनरलांपैकी एकाची CNSC म्हणून नियुक्ती करतील. प्रत्यक्षात, याचा अर्थ असा की मुनीर आणि त्यांच्या नंतर येणारे लष्करप्रमुख आण्विक दलांचे प्रमुख ठरवतील आणि तो अधिकारी थेट सैन्य साखळीला उत्तरदायी असेल. यामुळे नॅशनल कमांड अथॉरिटी (NCA) चे नियंत्रण कमी होऊ शकते. ही ती संस्था आहे ज्यात नागरी नेतृत्व आणि तिन्ही सैन्यदलांचे प्रमुख समाविष्ट असतात आणि जी आण्विक धोरणांवरील अंतिम निर्णय घेते. विद्यमान व्यवस्थेत आण्विक शस्त्रांच्या वापराबाबतचे निर्णय सामूहिकरीत्या घेतले जातात आणि पंतप्रधान त्यांचे अध्यक्ष असतात, परंतु नवीन दुरुस्तीमुळे आण्विक नियंत्रण प्रत्यक्षात एका लष्करी अधिकाऱ्याच्या हातात केंद्रीत होईल, ज्याची निवड स्वतः लष्करच करेल, आणि त्यामुळे रावळपिंडीतील सैन्य मुख्यालयाला पूर्ण वर्चस्व लाभण्याचा मार्ग मोकळा होईल.

परिणाम उघड आहेत: पाकिस्तानच्या इतिहासात प्रथमच लष्कर इतक्या व्यापक पातळीवर संपूर्ण सैन्य व्यवस्थेवर नियंत्रण ठेवणार आहे.

याहूनही चिंतेची बाब म्हणजे, स्वतःला "लोकशाही" म्हणवणाऱ्या देशात, सर्वोच्च लष्करी अधिकाऱ्यांना कायद्याच्या वरचे स्थान देत, त्यांना उत्तरदायित्वातून मुक्त ठेवणारी व्यवस्था निर्माण केली जात आहे. नव्या दुरुस्तीनुसार, पाच-तारांकित दर्जापर्यंत पोहोचलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला उदा. फील्ड मार्शल (सेना), मार्शल ऑफ द एअर फोर्स किंवा ॲडमिरल ऑफ द फ्लीट यांना आजीवन घटनात्मक संरक्षण मिळणार आहे. पाकिस्तानमध्ये असे दर्जे क्वचित दिले जातात, परंतु मे 2025 मध्ये भारतासोबत झालेल्या अल्पकालीन सीमेवरील संघर्षानंतर मुनीर यांना घाईघाईने फील्ड मार्शल म्हणून बढती देण्यात आली. आता दुरुस्तीमुळे त्या बढतीला घटनात्मक मान्यता मिळेल आणि त्यांचा दर्जा आयुष्यभर कायम राहील. दुरुस्तीच्या अटींनुसार, पाच-तारांकित अधिकारी "आजीवन पद, विशेषाधिकार आणि गणवेश राखून ठेवेल" आणि त्याला हटवण्याचा एकमेव मार्ग म्हणजे महाभियोग. थोडक्यात, मुनीर यांना कायद्याच्या कक्षेबाहेर ठेवले जाईल, कोणतेही न्यायालय किंवा भविष्यातील नागरी सरकार त्यांच्याविरुद्ध कारवाई करू शकणार नाही, आणि त्यांचा दर्जा हटवायचा असल्यास संसदेतील दोन-तृतियांश बहुमत आवश्यक राहील. याच धर्तीवर, नौदल आणि हवाई दल प्रमुखांनाही मे 2025 मधील ऑपरेशन "बुन्यान अल मारसूस" मधील भूमिकेबद्दल सन्मानित करण्यात आले असून, त्यांना आयुष्यभर गणवेश परिधान करण्याचा अधिकार आणि प्रतिरक्षा प्रदान केली जाईल.

त्याहूनही धक्कादायक म्हणजे या दुरुस्तीमुळे पाकिस्तानातील न्यायपालिकेच्या स्वतंत्र भूमिकेला बसलेला आणखी एक गंभीर धक्का. विद्यमान सरकारच्या कार्यकाळात न्यायालयांच्या अधिकारात झालेल्या सातत्यपूर्ण घसरणीला ही दुरुस्ती कायदेशीर रूप देते. घटनासंबंधी प्रश्न सोडवण्यासाठी फेडरल कॉन्स्टिट्यूशनल कोर्ट (FCC) नावाचे नवीन न्यायालय स्थापन केले जाणार असून, त्यामुळे पाकिस्तानच्या सर्वोच्च न्यायालयाचा घटनाविषयक अंतिम अधिकार कमी होणार आहे. पाकिस्तानचे सरन्यायाधीश आता नव्या घटनात्मक न्यायालयाच्या सरन्यायाधीशांच्या खालच्या दर्जाचे असतील, आणि नवे सरन्यायाधीश 68 वर्षांपर्यंत पदावर राहू शकतील, जे सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या निवृत्तीवयापेक्षा तीन वर्षांनी जास्त आहे. न्यायपालिकेच्या स्वायत्ततेवर झालेला हा मोठा घाव हा मुनीर आणि इस्लामाबादमधील शहबाज शरीफ यांच्या आघाडी सरकारचा सर्वांत "यशस्वी" राजकीय प्रयोग ठरत आहे.

या सत्ताकेंद्रित व्यवस्थेमुळे लष्करी संकटाच्या काळात घाईघाईने आणि कोणत्याही नियंत्रणाशिवाय निर्णय होण्याचा धोका वाढला आहे.

2024 मध्ये संसदेनं वादग्रस्त 26 वी घटनादुरुस्ती मंजूर केली, ज्यामुळे न्यायाधीशांच्या नियुक्तीची पद्धत बदलली गेली आणि सर्वोच्च न्यायालयाचे सुओ-मोटू (स्वतःहून प्रकरण उचलण्याचे) अधिकार काढून टाकण्यात आले. या प्रस्तावित बदलांमुळे 2008 मध्ये जनरल मुशर्रफ यांना सत्तेवरून हटवण्यात निर्णायक भूमिका बजावणारी पाकिस्तानची न्यायपालिका आता पूर्णपणे राजकीय प्रभावाखाली येईल आणि कार्यकारी शाखेच्या ताब्यात जाईल, आणि ही कार्यकारी शाखा स्वतः लष्कराच्या नियंत्रणाखाली आहे. आज पाकिस्तानचे सर्वोच्च न्यायालय हे फक्त त्याच्या पूर्वीच्या सामर्थ्याची एक सावली उरले आहे. काही प्रमाणात तडजोड म्हणून, मुख्य न्यायाधीश याहया आफ्रिदी पदावर असताना पाकिस्तानचे सरन्यायाधीश राहतील; त्यांच्या निवृत्तीनंतर, फेडरल कॉन्स्टिट्यूशनल कोर्ट आणि सर्वोच्च न्यायालय या दोन्हींपैकी ज्येष्ठ सरन्यायाधीश पाकिस्तानचे सरन्यायाधीश होतील.

राजकीय नेतृत्वाने या दुरुस्तीपुढे पूर्ण शरणागती पत्करली, ही बाब गेल्या तीन वर्षांत लोकशाही संस्थांची झालेली अधोगती स्पष्टपणे दाखवते. सरकारने हे विधेयक सिनेटमध्ये सादर केले, आणि प्रमुख राजकीय पक्षांनी त्यास कोणताही ठोस विरोध केला नाही. अल्प प्रतिकाराच्या वातावरणात हे विधेयक दोन-तृतियांश बहुमताने पारित झाले. विशेष म्हणजे, पाकिस्तान मुस्लिम लीग-नवाझ (PML-N) आणि पाकिस्तान पिपल्स पार्टी (PPP) यांनी ज्या ऐतिहासिकदृष्ट्या लष्कराच्या हस्तक्षेपाच्या विरोधात उभ्या राहिल्या, त्यांनीच हे विधेयक पुढे नेले. मुनीर यांच्या कृपेदृष्टिपोटी त्यांनी देशाच्या भविष्यातील परिणामांकडे डोळेझाक केली. पाकिस्तानचा तथाकथित 'हायब्रिड' राजकीय ढाचा आता अशा स्थितीत पोहोचला आहे, जिथे नागरी अधिकारांचा केवळ दिखावा उरलाय, परंतु त्यात कोणतीही वास्तविकता नाही.

मुनीर यांची सत्ता संचयनाची शैली बघितली तर भूतकाळातील लष्करी हुकूमशहांचे 1980 मधील जनरल झिया उल हक आणि 2000 च्या दशकातील जनरल परवेझ मुशर्रफ, यांची धोरणे आठवतात. झिया आणि मुशर्रफ यांनीही संसदेला आणि न्यायालयांना गौण बनवले, आदेशाद्वारे राज्यकारभार केला आणि स्वतःचे वर्चस्व कायम राखण्यासाठी घटनादुरुस्ती करून घेतल्या (झियाची 8 वी आणि मुशर्रफची 17 वी दुरुस्ती). मुनीर यांच्यात आणि त्यांच्या पूर्वसूरींमध्ये साम्य असले तरी एक मोठा फरक आहे. त्यांनी अद्याप देशात स्पष्टपणे मार्शल लॉ लागू केलेला नाही किंवा राष्ट्रपतीसारखी नागरी पदेही स्वीकारलेली नाहीत. त्याऐवजी, ते पडद्यामागून सत्तेचे सूत्र हलवतात आणि लोकांसमोर नागरी सरकार कार्यरत असल्याचा भास कायम ठेवतात.

पाकिस्तानचे सर्वोच्च न्यायालय आता पूर्वीसारखे ताकदवान राहिलेले नाही.

मुनीर यांनी सरकारला आपल्या बाजूला करून, लष्कराच्या फायद्याचे कायदे मंजूर करून घेतले. त्यामुळे त्यांना कोणत्याही टीकेचा सामना करावा लागला नाही आणि रोजच्या प्रशासनाची जबाबदारीही त्यांनी टाळली. वरवर पाहता ते घटनात्मक नियमांच्या चौकटीत आहेत, पण ही चौकट आता त्यांच्या मनाप्रमाणे बदलली जात आहे. सर्वात मोठी बाब म्हणजे त्यांनी स्वतःला आजीवन फील्ड मार्शल पद मिळवून दिले आहे, तेही संविधानाच्या आधारावर आणि कायदेशीर संरक्षणासह. हे पद मिळाल्याने मुनीर यांच्यावर कोणतीही कारवाई करणे जवळपास अशक्य झाले आहे. झिया आणि मुशर्रफ यांनाही अशी उघड मान्यता मिळाली नव्हती.

गेल्या तीन वर्षांत मुनीर यांनी आपले सर्व उद्दिष्ट साध्य केले. इम्रान खान यांच्या PTI पक्षाला कमजोर केले, न्यायपालिका निष्क्रिय केली, संसदेला आपल्या नियंत्रणाखाली आणले आणि स्वतःची सत्ता कायम ठेवली.

# मंग्याळ येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम व विशेष बालसभा संपन्न

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**मुखेड -** मुखेड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मंग्याळ येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हणमंत पाटील काटशेव होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून उपाध्यक्ष विष्णूदास पिटलेवाड, माजी पोलिस पाटील बळीराम सोनकांबळे, तसेच शंकरराव पिटलेवाड उपस्थित होते.
शाळेचे मुख्याध्यापक नरसिंग सोनटक्के यांनी प्रास्ताविकातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षमय



व बहुमूल्य कार्यावर प्रकाश टाकला. माजी पोलिस पाटील बळीराम सोनकांबळे यांनी डॉ. बाबासाहेब आणि महात्मा फुले यांच्या कार्याची आठवण करून देत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी संदेश दिला.
यावेळी 28 नोव्हेंबर महात्मा फुले स्मृतिदिन आणि 6 डिसेंबर महापरिनिर्वाण दिनानिमित्त विशेष बालसभेचे आयोजन करण्यात आले. बालसभेच्या अध्यक्षस्थानी इयत्ता सातवीचा विद्यार्थी तिरुपती दत्ता श्रीरामे होता. विद्यार्थी अंजली चेबळे, मयुरी काटशेव, मानवी इंद्राळे, रुद्र चेबळे, ओमकार तारशेट्टे, शाहू तारशेट्टे, ज्ञानेश्वरी मंडिले यांनी डॉ. बाबासाहेब आणि महात्मा फुले यांच्या जीवनकार्यावर प्रभावी भाषणे केली. कार्यक्रमाचे आकर्षक सूत्रसंचालन कु. सृष्टी श्रीरामे हिने केले, तर उपस्थितांचे आभार शरद पाटील यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहशिक्षक आदिनाथ जाधव, बालाजी पुठवाड, बालाजी कवठेकर, बाबूराव घोडके, सौ. लक्ष्मीबाई घाटे, बलभिम वाघमोडे यांनी परिश्रम घेतले.
मुख्याध्यापक नरसिंग सोनटक्के यांनी सादर केलेल्या 'गुरुजी शाळेत घ्या ना मला' या भावगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. विद्यार्थ्यांसह गावकरी आणि शिक्षणप्रेमी नागरिकांची मोठी उपस्थिती होती.

## लोहगाव येथील स्टेट बँक ऑफ इंडियाची शाखा इतरत्र स्थालांतरीत करू नये - पाचपिपळीकर



**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**बिलोली -** बिलोली तालुक्यातील मौजे लोहगाव येथील स्टेट बँक ऑफ इंडियाची शाखा इतरत्र स्थालांतरीत करण्यात येऊ नये म्हणून दि.८ डिसेंबर २०२५ रोजी बिलोली तालुका काँग्रेस पक्षाच्या वतीने निवेदन करण्यात आले.
सदर लोहगाव स्थित स्टेट बँक ऑफ इंडियाची शाखा गावकर्यासाठी, व्यापारी, व परिसरातील गावकर्यासाठी एकमेव राष्ट्रीयकृत बँक असून, शेतकरी,महिलांना बचत गट यांना बँकिंग व्यवहार करण्यासाठी अत्यंत सोईस्कर व आवश्यक असलेली शाखा आहे.
ही स्टेट बँक ऑफ इंडिया ची शाखा इतर ठिकाणी हालविण्याची हालचाली चालू असल्याचे समजले असता सदरील स्टेट बँक ऑफ इंडियाची शाखा इतरत्र ठिकाणी स्थलांतरीत करू नये
ही शाखा लोहगाव येथेच राहवी म्हणून बिलोली तालुका काँग्रेस कमिटीचे तालुका अध्यक्ष शिवाजी पाटील पाचपिंपळीकर व काँग्रेस शिस्टमंडळाच्या वतीने लेखी निवेदनाद्वारे बिलोलीचे तहसिलदार गजानन शिंदे यांना कळविण्यात आले आहे. त्यावेळी
जि. प.माजी सभापती संजय बेळगे,ता काँग्रेस अध्यक्ष शिवाजी पा.पाचपिंपळीकर, लोहगाव सरपंच यादवराव कोरनुळे, पाचपिंपळी सरपंच कमलकिशोर पाटील,तळणी सरपंच नरसिंग मोंटेवाड,हारनाळा सरपंच सामंत पा.नरवाडे,गागलेगाव सरपंच उषाताई जिंके,कोल्हेबोरगाव सरपंच संजय मुंडकर,जिगळा सरपंच रावसाहेब येरडे,कुंभरगाव सरपंच माधवराव नरवाडे,माजी सभापती शंकर यंकम,तोरणा सरपंच,तसेच
दिलीप पांढरे, पांडूरंग रामपुरे, प्रल्हाद वाटोळे,सयाराम निदाने,तिरुपती पा.हिवराळे, सुर्यकांत पा.नरवाडे यांच्या निवेदनावर स्वाक्षरी असून,हे सर्वजण निवेदन देतेवळी उपस्थित होते.

## शनिवार पेठ येथे शेतकरी संघटनेची शाखा स्थापन



**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**किनवट -** झालेल्या बैठकीत किनवट तालुक्यातील शनिवार पेठ येथे शरद जोशी प्रणीत शेतकरी संघटनेची शाखा स्थापन करण्यात आली. शेतकरी संघटना विस्कळीत झाल्याने मागील तीन दशकांनंतर शेतकरी संघटित होण्याला किनवट तालुक्यात मुहूर्त सापडला आहे. शेतकरी संघटित होणे ही काळाची गरज असून शेतकऱ्यांच्या समस्या आता शेतकऱ्यांनाच सरकार दरबारी मांडाव्या व सोडवून घ्याव्या लागतील, असे यावेळी युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष रमेश कदम म्हणाले.
याप्रसंगी झालेल्या बैठकीत शाखाप्रमुख म्हणून रमण तिरुपती कागणे, उपाध्यक्ष नागोजी विश्वनाथ मुंडकर, सचिव गणेश माधव घुकसे, कोषाध्यक्ष प्रल्हाद बळीराम राठोड तर सदस्य म्हणून ज्ञानोबा रामराव कैंद्रे, सुरेश तेजेराव मुंडकर, माधव रामजी गीते, उत्तम गोविंदराव केंद्रे, सुनील विष्णू जाधव, सुभाष धोंडीबा मुंडकर, शिवाजी बाळप्पा स्वामी, शिवाजी रामजी गीते, संतोष नामदेव गीते, माधव परसराम घोटेकर, अशोक कांबळे, आनंदराव घारके, आनंदराव गंगाराम आरवले, कोंडीबा गंगाराम सूर्यवंशी, पांडुरंग रंगराव वागढव, संतोष रमेश वागढव, कोंडीबा राजाराम वागढव, माधव काशिनाथ लाटकर, अशोक दिगंबर लाटकर, अशोक धोंडीबा केंद्रे, गोविंद लक्ष्मण चोले, बालाजी बाबाराव लालवाडे यांची निवड करण्यात आली.

## लोहगाव येथील एसबीआय बँकेच्या शाखेचे स्थलांतर थांबवा – काँग्रेस पक्षाची मागणी



**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**बिलोली -** बिलोली तालुक्यातील लोहगाव येथील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेचे स्थंलातर करण्याच्या हालचालीची चर्चा होत आसुन तरी या भागातील खातेदारांची गैरसोय लक्षात घेऊन वरीष्ठानी स्थलांतरांचा निर्णय मागे घ्यावा अशी मागणी तालुका काँग्रेस पक्षाच्या वतीने एका निवेदनाद्वारे तहसीलदार यांच्याकडे करण्यात आली.
बिलोली तालुक्यातील लोहगाव हे गाव जवळपास सात ते आठ हजार लोकवस्तीचे गाव असून या ठिकाणी अनेक छोटी-मोठे व्यवसायिक असून या शाखेस या भागातील जवळपास पंधरा ते विस गावचा समावेश असून अनेक व्यवसायिका बरोबर शेतकरी मोठया संख्येनी या बँकेशी नाळ जोडल्या गेलेली आहे.तरी ही शाखा या भागातील खातेदारासाठी अत्यंत महत्त्वाची असून भविष्यात या शाखेशी जोडल्या गेलेल्या खातेदारांची व जनतेची होणारी गैरसोय लक्षात घेऊन या शाखेचे ईतरत्र स्थलांतर न करता येथेच कायमस्वरूपी आसावी अशी मागणी बिलोली तालुका काँग्रेस पक्षाच्या वतीने आज दिनांक
८ डिसेंबर सोमवार रोजी बिलोली तहसीलदार गजानन शिंदे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली यावेळी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष प्रा.शिवाजी पाटील पाचपिपळीकर, दिलीप पांढरे,राजु पा. शिंपाळकर,पांडुरंग पा.रामपुरे, तिरुपती पा. हिवराळे, माधव पा. नरवाडे, हाणमंत नरवाडे, नरसिंग मोंडेवाड, सयाराम निदाने, प्रल्हाद वानोळे, आनिल तोटावाड, सुर्यकांत नरवाडे,यांच्यासह अनेकांच्या सहयाचे निवेदन देण्यात आले.

# भव्य रक्तदान शिबिर व गीतपुष्पांजली कार्यक्रम उत्साहात पार

## स्ट्रॉंग गोल्ड ब्ल्यू फाउंडेशन, नांदेड तर्फे १८ वे सामाजिक योगदान

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**नांदेड :** स्ट्रॉंग गोल्ड ब्ल्यू फाउंडेशन, नांदेड यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या




६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित भव्य रक्तदान शिबिर व गीतपुष्पांजली कार्यक्रम सामाजिक बांधिलकीची परंपरा जपत यंदाही उत्साहात संपन्न झाला. सलग अठरा वर्षे हा उपक्रम शासन नियमांचे पालन करून राबविला जात आहे.
या वर्षीच्या शिबिरात सहभागी झालेल्या रक्तदात्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वाक्षरीसह विशेष ॲक्रेलिक ट्रॉफी तसेच स्वेटर प्रदान करण्यात आले. रक्तदात्यांच्या सेवाभावाचा गौरव करण्याचा हा उपक्रम उपस्थितांनी कौतुकास्पद मानला.
गीतपुष्पांजलीच्या सांस्कृतिक सत्रात नागपूर येथील सुप्रसिद्ध कलाकार सुरज आतिश 'छोटे वस्ताद', प्रेम प्रांजल बोधक, महाराष्ट्रातील नामांकित गायिका नालंदा सांगवीकर, तसेच सुफी भीम गीतांसाठी ओळखल्या जाणाऱ्या जाधव सिस्टर यांनी आपल्या सुरेल वाणीतून बाबासाहेबांना अभिवादन अर्पण केले. कार्यक्रमस्थळी रसिकांची मोठी उपस्थिती पाहायला मिळाली.
उपक्रमाचे उद्घाटन शिवानंद मीनगिरे (सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण विभाग, नांदेड) आणि परमेश्वर कदम (पोलीस निरीक्षक, वजीराबाद पोलिस ठाणे) यांच्या हस्ते झाले. मान्यवरांनी फाउंडेशनच्या सामाजिक कार्याचे कौतुक करत रक्तदान आणि सामाजिक ऐक्याची गरज अधोरेखित केली.
कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्रीमती श्वेता वानखेडे, संजय टीके, राधास्वामी गणगण, शिवा गवारे, श्रीकांत मगर, शंकर येल्लीगेटी, संजय शिंदे, राम दुधमल, लखन दुधमन यांनी महत्त्वपूर्ण परिश्रम घेतले. सामाजिक बांधिलकी, बंधुता आणि रक्तदानाच्या मूल्यांना बळकटी देणारा हा उपक्रम यंदाही विशेष गाजला.

# हिमायतनगर तालुक्यात बिबट्याचा दहशतवाद

## महिलांसह शेतकरी मजुरांमध्ये भीतीचे वातावरण

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**हिमायतनगर, उत्कर्ष मादसवार**

तालुक्यात बिबट्याचा वावर वाढल्याने शेतीकाम करणाऱ्या महिला-पुरुष मजुरांमध्ये भीतीचे सावट पसरले आहे. सोमवारी बोरगडी रस्त्यावरील सोलार प्लांट व सिरंजनी शिवारातील खरब परिसरात कापसाची वेचणी करत असलेल्या महिलांना अचानक बिबट्या दिसल्याने एकच खळबळ उडाली. क्षणात ही वार्ता शेतशिवारात पसरताच परिसरातील सर्व महिला-पुरुष मजूर काम सोडून तात्काळ घरी परतले. शेतकरी ढोणे यांनी हा प्रकार वनविभागाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर वनविभागाचे पथक तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. परिसराची पाहणी केल्यानंतर बिबट्या वारंवार फिरत असल्याचे पुष्टी करण्यात आली आहे. दरम्यान नागरिकांना पाहून बिबट्या इतरत्र निघून गेला असल्याचे वनविभागाचे म्हणणे आहे.



वनविभागाने नागरिकांना सुचना केल्या असून, शेतात एकटे जाणे टाळावे, संध्याकाळनंतर शेती परिसरात वावर कमी ठेवावा, शक्यतो समूहाने शेतीकाम करावे असे आवाहन केले असून, परिस्थितीवर विभागाचे पथक सतत लक्ष ठेवून आहे.
हिमायतनगर तालुक्यात वाढलेल्या या बिबट्याच्या वावरामुळे ग्रामीण भागात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.
दोन दिवसांपूर्वी वडगाव तांडा परिसरातील एका शेतकऱ्यावर बिबट्यांना लागलेला होता त्यानंतर बिबट्याचा हिमायतनगर तालुका परिसरात वावर होत असल्याने शेतकरी नागरिक मजूरदार वर्गात भीती निर्माण झाली आहे वनविभागाने कोणतेही अनुचित घटना घडण्यापूर्वी सीसीटीव्ही कॅमेरे लावून बिबट्याच्या हालचालीवर लक्ष केंद्रित करून सर्वांना सुरक्षा द्यावी अशी मागणी नागरिक वर्गातून केली जात आहे.

हे वृत्तपत्र, मालक, प्रकाशक व संपादक **डोईजड ज्ञानेश्वर बालाजीराव** यांनी मुद्रक **सतिश विजय सोनवणे** यांच्या **यश प्रिंटर्स अँड पब्लिकेशन शिवाजी नगर नांदेड ता.जि. नांदेड (महाराष्ट्र) – ४३१६०२** येथे प्रकाशित केले.
E-MAIL - shramiklokrajya@gmail.com

**Daily Shramik Lokrajya,** Owner, Publisher & Editor **DOIJAD DNYANESHWAR BALAJIRAO,** Printer **SATISH VIJAY SONWANE**. Printed at **YASH PRINTERS & PUBLICATION HOUSE NO, 1-2-211, SHIVAJI NAGAR, NANDED**, Tq. Dist. **NANDED**, (Maharashtra) - 431602 M.S. & Published Near **AT POST. GAYATRI NAGAR, MUKHED TQ. MUKHED, DIST. NANDED-431715**
Email : shramiklokrajya@gmail.com

# लेंडी धरणग्रस्तांच्या मागण्यांसाठी रणसंग्राम



## उपोषणासह धरणाचे काम बंद करण्यासाठी १२ गावांत बैठका सुरू

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**मुखेड -** मुखेड तालुक्यातील रावणगांव शिवारातील लेंडी धरणग्रस्तांचा संताप चरमसीमेवर पोहोचला आहे. "अगोदर पुनर्वसन, मग धरण" या शासनाच्या परिपत्रकाची अंमलबजावणी न होताच धरणाची गळभरणी पूर्ण करण्यात आली. एकही गाव स्थलांतरीत न करता झालेले हे काम धरणग्रस्तांना थेट संकटात ढकलणारे असल्याचा आरोप स्थानिकांकडून होत आहे.

दि .१८ ऑगस्ट २०२५ च्या अतिवृष्टीत रावणगाव, हासनाळसह अनेक गावे जलमय झाली; हासनाळ येथे सहा नागरिकांचा मृत्यू झाला. शेकडो जनावरे, अन्नधान्य, घरातील आवश्यक वस्तू वाहून गेल्या. बचाव पथकांनी रावणगाव येथील २७२ नागरिकांना सुरक्षित बाहेर काढले, तर इतर गावांतील नागरिकांनाही हलविण्यात आले.

प्रशासनाने तयार केलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये त्यांची तात्पुरती सोय करण्यात आली; मात्र अन्न-वस्त्र-निवाऱ्याच्या मूलभूत गरजांची आजही कमतरता जाणवत आहे.चार महिने उलटूनही शासनाकडून देय लाभ न मिळाल्याने धरणग्रस्तांची परिस्थिती अधिक बिकट झाली आहे. असे धरणग्रस्त यांचे म्हणणे आहे.

विविध मागण्या प्रलंबितच राहिल्याने ३१ मे रोजी रावणगाव–मुंबई असा ६५० किमी पायी मार्च काढण्यात आला आणि मंत्रालयात निवेदन देऊन चर्चा झाली, परंतु तरीही कामे मार्गी लागत नसल्याची खंत व्यक्त करण्यात येत आहे.

या बैठकीतून उपजिल्हाधिकारी कार्यालय, देगलूर येथे उपोषण तसेच धरणाचे सुरू असलेले काम थांबवण्यासाठी आंदोलन छेडण्याचा निर्णय घेतला जात आहे.लेंडी धरणग्रस्तांचा आवाज आता अधिक तीव्र होत असून प्रलंबित मागण्या निकाली काढण्यासाठी शासनाने तातडीने पावले उचलण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

### धरणग्रस्तांच्या प्रमुख प्रलंबित मागण्या

- वाहतूक खर्च ₹५,००० देय
- स्थलांतरीत भत्ता दरमहा ₹३,०००
- पुनर्स्थापना भत्ता ₹५,०००
- छोटे दुकानधारकांना ₹२५,००० मदत
- सहा कुटुंबांची घरे संपादित करून मावेजा देणे
- तरुणांची लग्नाची अट रद्द करणे व स्वच्छ पुनर्वसन लाभ
- नोकरीऐवजी एकरकमी आर्थिक मदत
- मुला–मुलीला समान स्वच्छ पुनर्वसन लाभ
- गावातील रहिवाशांना बेघर न ठेवता भूखंड वाटप
- अपंग, घटस्फोटिता, भूमिहीन शेतमजूरांसाठी स्वतंत्र तरतूद
- पुरात घर वाहून गेलेल्यांना पुरग्रस्त प्रमाणपत्र
- धरणगटातील ग्रामीण कुटुंबांना इंदिरा आवास किंवा GR नुसार ₹१,६५,०००
- गावे भूईसपाट झाल्यामुळे जबाबदार अधिकाऱ्यांना निलंबित करण्याची मागणी
- भेंडेगाव (खु) व भेंडेगाव (बु) येथील पुनर्वसनातील प्रलंबित प्रश्न निकाली काढणे
- मुक्रमाबाद येथे संपादित घरांचा मावेजा कलम ७७(२) नुसार देणे
- पुनर्वसनस्थळी रस्ते, पाणी, वीज, पोहोच रस्ते तातडीने पूर्ण करणे

### १२ गावांमध्ये जनजागृती — उपोषण, धरण बंद आंदोलनाची तयारी

**या सर्व मागण्यांसाठी धरणाचे काम तत्काळ बंद करण्याची मागणी धरणग्रस्तांनी केली आहे. रावणगाव ते मुंबई पायी चालत जाणारे लेंडी धरणग्रस्तांचे नेते जैनोदीन पटेल, माजी सदस्य सुभाष आप्पा बोधने, आशोक देसाई, बालाजी पाटील भाटापूरकर, निशिकांत पाटील कोठारे, सरपंच मोतीराम राव, नागरिक प्रतिनिधी, पत्रकार आणि इतर गावांचे प्रमुख यांच्या संयुक्त नेतृत्वाखाली १२ गावांत बैठका सुरू आहेत.**

---

महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन —

# नांदेड मंडळ अध्यक्षपदी कॉ. हेमंतकुमार राजूरकर यांची निवड

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**




**नांदेड :** महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनच्या नांदेड मंडळाची कार्यकारिणी बैठक आज दि. ७ डिसेंबर २०२५ रोजी साठे चौक येथील कॉम्रेड दत्ताजी देशमुख सभागृहात उत्साहात पार पडली. या बैठकीस कॉम्रेड संजय टाक अध्यक्षस्थानी होते तर कॉम्रेड पी.एन. तेलंग, कॉम्रेड एस.एम. स्वामी, कॉम्रेड विजय रणखांब, कॉम्रेड माधव गोरखवाड, कॉम्रेड मोईनभाई, कॉम्रेड सतीश वाघमारे, कॉम्रेड शंकर खिस्से पाटील, कॉम्रेड भीमराव खानसोळे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीस नांदेड परिमंडळ, देगलूर, भोकर, नांदेड शहर व ग्रामीण विभागातील पदाधिकारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोकशाही पद्धतीने घेण्यात आलेल्या निवड प्रक्रियेत कॉम्रेड हेमंतकुमार राजूरकर (मिसलवाड) यांची एकमताने नांदेड मंडळाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. याच बैठकीत कॉम्रेड गोविंद कल्याणकर व कॉम्रेड स्मिता ठक्के यांची उपाध्यक्ष, तर कॉम्रेड उद्धव बंडेवाड यांची मंडळ सचिव म्हणून निवड झाली. सहसचिव म्हणून कॉ. हनुमंत चोंडे, कॉ. संदीप नरोड, कॉ. शेख अहमद, कॉ. राजू डोईजड आणि कॉ. श्रीराम ढगे यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या. तसेच कॉ. सचिन खांडेकर व श्रीकृष्ण टाकळीकर यांची मंडळ संघटक, तर दत्ता मेनकुदळे व विश्वनाथ परळकर यांची मंडळ सदस्य म्हणून निवड झाली. प्रमोद कळसे यांची प्रसिद्धीप्रमुख व भैय्यासाहेब सोनकांबळे यांची तांत्रिक सदस्य म्हणून निवड करण्यात आली.

बैठकीचे सूत्रसंचालन बालाजी सक्करगे (सर्कल सचिव, नांदेड) यांनी केले. आभार प्रदर्शन कॉम्रेड उद्धव बंडेवाड (सर्कल उपाध्यक्ष) यांनी मानले.

नवीन कार्यकारिणीच्या निवडीमुळे नांदेड मंडळात नवचैतन्य निर्माण झाल्याचे उपस्थित पदाधिकारी व सदस्यांनी नमूद केले.

---

# पत्रकाराचा मुलगा झाला एमडी डॉक्टर

## डॉ.ओंकार दाढेल यांनी साकारलं आई–वडिलांचं स्वप्न

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**नांदेड -** अत्यंत प्रतिकूल परिस्थिती, मर्यादित साधनसामग्री आणि सातत्याने वाढणारी स्पर्धा या सगळ्यावर मात करत नांदेडच्या पत्रकार कुटुंबातील मुलाने गरुड झेप घेतली  आहे. लोकमतचे वरिष्ठ उपसंपादक म्हणून गेल्या १८ वर्षांपासून नांदेडमध्ये कार्यरत असलेले पत्रकार भारत दाढेल आणि प्रा. डॉ. विजया दाढेल यांचा मुलगा  डॉ.ओंकार दाढेल याला एमडी रेडिओलॉजी अभ्यासक्रमासाठी जम्मू–काश्मीरमधील श्रीनगर येथील शासकीय मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला आहे.

डॉ.ओंकारने पुण्यातील एमआयटी मेडिकल कॉलेजमधून एमबीबीएस पूर्ण केले. अभ्यासातील शिस्त व जिद्द कायम ठेवत त्याने पदवीत्तर शिक्षणासाठी नीट पीजीमध्ये उल्लेखनीय यश मिळवले. त्याच्या गुणवत्तेच्या बळावर पहिल्याच यादीनुसार श्रीनगरच्या प्रतिष्ठित शासकीय मेडिकल कॉलेजमध्ये एमडी रेडिओलॉजीसाठी त्याची निवड झाली. ग्रामीण परिस्थितीतून आलेल्या, परंतु स्वप्ने मोठी ठेवणाऱ्या या डॉ.ओंकारने कठोर परिश्रम आणि चिकाटीच्या जोरावर व्यावसायिक शिक्षणाच्या शिडीवर मोठी झेप घेतली आहे.

सरपंच नगर येथील सुधाकरराव नाईक शाळेत प्राथमिक शिक्षण आणि नंतर प्रतिभा निकेतनमधून बारावीपर्यंतचे शिक्षण घेताना त्याने अभ्यासातील सातत्य कधीच सोडले नाही. पहिल्याच प्रयत्नात नीट उत्तीर्ण करत त्याने एमबीबीएस मिळवले आणि तेही वेळेवर पूर्ण केले.

> **आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने मला माझे ध्येय साध्य करणे खूप गरजेचे होते. त्यामुळे मी जे ठरवले होते ते पूर्ण करणे माझ्यासाठी मोठे आव्हान होते. केवळ अभ्यासातील सातत्य आणि ध्येय समोर ठेवल्याने मला हे यश प्राप्त झाले.या वेळी मला माझ्या आईने व वडिलांनी खूप आधार दिला.**
> **डॉ . ओंकार दाढेल**

त्यानंतरच्या एक वर्षांत त्याने सततच्या अभ्यासातून स्वतःला पदवीत्तर अभ्यासक्रमासाठी सिद्ध केले.

*उच्च शिक्षणासाठी सर्वस्व पणाला*



पत्रकारिता हे सदैव धावपळ आणि ताणाचे क्षेत्र. तरीही भारत दाढेल यांनी अत्यंत प्रतिकूल आर्थिक परिस्थितीतही कुटुंबातील दोन्ही मुलांना तसेच पत्नीला उच्चशिक्षण देण्यासाठी सर्वस्व पणाला लावले. डॉ.ओंकारची आई प्रा. डॉ. विजया दाढेल या पीपल्स कॉलेजमध्ये हिंदीच्या प्राध्यापिका आहेत. धाकटा मुलगा अभिषेक दाढेल हा पुण्यातील नामांकित महाविद्यालयात एमसीए करत आहे. एक सर्वसामान्य कुटुंब शिक्षणाच्या जोरावर कशी उंच भरारी घेऊ शकते, याचे  हे उत्तम उदाहरण ठरले आहे.

डॉ.ओंकारच्या या यशामुळे  'पत्रकाराचा मुलगाही डॉक्टर होऊ शकतो' ही प्रेरणा निर्माण होत आहे. संघर्ष, चिकाटी आणि शिक्षण ही तीन मूल्ये जपली तर कोणतेही स्वप्न अशक्य नसते, याचे मूर्त रूप

---

# मुखेडमध्ये रत्ननिधी व रोटरी कडून आधुनिक कृत्रिम पाय वाटप शिबीर संपन्न

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**मुखेड :-** शहरात रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई आणि रोटरी क्लब मुखेड सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने आधुनिक कृत्रिम पाय वाटप शिबीर दि. 04 रोजी घेण्यात आले. या सामाजिक उपक्रमाचा लाभ महाराष्ट्र, तेलंगणा या राज्यातील सीमावर्तीय भागातील 40 दिव्यांग स्त्री - पुरुष यांनी घेतला. सामाजिक भान मनाशी ठेऊन दिव्यांगाना आपले आयुष्य सुंदर जगण्यासाठी सामाजिक दायित्व लक्षात घेऊन हा उपक्रम राबवण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष रोटरी क्लब नांदेड सिटीचे माजी सह प्रांतपाल रो. मुरलीधर भूतडा, प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामीण महाविद्यालय, वसंतनगरचे प्राचार्य डॉ. हरिदास राठोड, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेडचे प्राचार्य डॉ. शिवानंद अडकिणे,व्यासपीठावर




रोटरी सचिव रो. डॉ.. संजीव रेड्डी, रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबईचे टेक्निशियन मनोज, अदनान, रो. डॉ. अशोक कौरवार, रो. जगदीश बियाणी, आद्या डायगनोस्टिक सेंटरचे रो. डॉ. श्रीहरी बुडगेमवार, रो. नरेश कळसकर, रो.डॉ.संजय पाटील, रो. संजीव डोईबळे, रो. पवन पोतदार, रो. डॉ. स्वप्नजा चांडोळकर, रो. ॲड. शारदा जाधव पाटील यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक रोटरी सचिव डॉ. संजीव रेड्डी, सूत्रसंचालन प्रकल्प समन्वयक रो. प्रा. डॉ. चंद्रकांत एकलारे तर आभार प्रदर्शन रो. डॉ. श्रीहरी बुडगेमवार यांनी केले.

प्राचार्य डॉ. अडकिणे यांनी ग्रामीण भागातील लोकांना वेळेवर सोई सुविधा मिळत नाहीत. त्यांची अडचण ओळखून सहकार्य करणे खूप मोलाचे कार्य आहे. दिव्यांग व्यक्ती कशात कमी राहत नाहीत परंतु त्यांनी दिव्यांगावर विजय मिळवून आपली ओळख निर्माण करावी. आधुनिक कृत्रिम पाय वाटप शिबीर हे स्वावलंबी बनवण्याचे शिबीर आहे असे सांगितले. प्राचार्य डॉ. राठोड यांनी हे शिबीर उत्तम प्रकारे आयोजित केल्याबद्दल आयोजकाचे अभिनंदन केले. दिव्यांग व्यक्तीला संघर्ष खूप करावा लागतो. या काळात सोबतीला कोणीतरी असल्यामुळे अधिकचे बळ मिळत असते. सदरील कार्य हे पुण्याचे आहे. भाविष्यात असेच कार्य करावे असे विचार मांडले.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी रो. भूतडा यांनी रोटरी क्लब ही जगात विविध क्षेत्रात कार्य करणारी संस्था आहे. ही संस्था सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करत आहे.समस्या सोडवण्यासाठी सदैव तत्पर आहे . भविष्यात अभिनव उपक्रम हाती घेऊन कार्य सुरु राहणार आहे. आजचे शिबीर हे अतिशय उत्तम प्रकारे नियोजन करून खरे लाभार्थी लाभ घेतलेले आहेत. दिव्यांग व्यक्ती निराश न होता सकारात्मक राहिले पाहिजेत असे मार्गदर्शन केले. यावेळी बहुसंख्येने दिव्यांग लाभार्थी, नातेवाईक, मुखेड सिटी चे सर्व रोटरीयन, आद्या डायगनोस्टिक सेंटरचे सर्व कर्मचारी व नागरिकांची उपस्थिती लक्षणीय होती.